प्रेस नोट दि. २०/०४/२०१९.

**कोथरुड मधील रॉयल लॉन्ज गार्डन रेस्टॉरंटमध्ये चालणारे हुक्का पार्लरवर गुन्हे शाखेकडुन छापा टाकुन हुक्का पिणारे ग्राहकांवर व हॉटेलवर कारवाई, विना परवाना दारु विक्री चालु असल्याचेही आले समोर..............**

महाराष्ट्रामध्ये शासनाने राज्यात कोठेही हुक्का धुम्रपानास बंदी घातली असुन पुणे शहरातील हुक्का पार्लरवर पुणे पोलीसांकडुन वेळोवेळी कारवाई करण्यात येत आहे. दि.१९/०४/२०१९ रोजी गुन्हे शाखा युनिट-४ कडील पोशि शंकर संपते यांना त्यांचे बातमीदारामार्फत कोथरुड मधील रॉयल लॉन्ज गार्डन रेस्टॉरंटमध्ये हुक्का पार्लर चालु असल्याची माहीती मिळाली. त्याप्रमाणे सहा.पो.नि. अश्विनी जगताप, पेहवा ४४९५ पवार, पोना १५५९ इंगळे व पोशि शंकर संपते यांचे पथकाने पौड रोडवरील कचरा डेपो जवळील **रॉयल लॉन्ज गार्डन रेस्टॉरंटमध्ये छापा टाकला असता नमुद हॉटेलमध्ये** ६ इसम हे वेगवेगळया सोफ्यावर बसुन, हुक्का धुम्रपान करीत असल्याचे दिसुन आले. तसेच दोन कामगार १. दिन मोहंम्मद शेख, वय- २१ वर्ष, रा. रॉयल लॉन्ज हॉटेल, मुळ गांव शालीग्राम, जि. नादिया, पश्चिम बंगाल २. अब्बास रिजाहुल शेख, वय-३१ वर्ष, रा. रॉयल लॉन्ज हॉटेल, मुळ गांव तेहट्टो, जि. नादिया, पश्चिम बंगाल, हुक्का पिणारे ग्राहकांना सर्व्हिस करीत असल्याचे दिसुन आले.

त्यामुळे सदर ठिकाणी हुक्का पिणारे ०६ ग्राहकांवर सिगगरेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने अधिनियम सन २००३ चे कण्.४,२१ अन्वये कारवाई केली.

तसेच सदर ठिकाणी काउन्टरवर वेगवेगळया कंपनीच्या लिकर विक्रीसाठी ठेवल्याचे दिसून आलेने त्याबाबत हॉटेलचे मालक जुनेद अन्सारी यांचेकडे एफएल ३ प्रमाणे दारू विक्रीचा परवाना दाखविणेबाबत सांगितले असता त्यांनी त्यांचेकडे अदयाप एक्साईज खात्याचा कोणताही परवाना नसल्याचे सांगितले. त्यामुळे हॉटेमध्ये विक्रीसाठी ठेवण्यात आलेली वेगवेगळया कंपनीची **२३,९३५ रु किमतीची इंडियन मेड फॉरेन लिकरचे ७ बॉक्स तसेच २१६०० रु किमतीचे** हुक्का फ्लेवर, हुक्का पॉट, व त्यास लागणारे साहित्य **असा सर्व मिळुन ४५,५३५ रु किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आणि रॉयल लॉन्ज गार्डन रेस्टॉरंटचे मालक जुनेद असगरअली अन्सारी, वय-३५ वर्ष- रा. फ्लॅट नं. २५/एफ, दुरानी कॉम्प्लेक्स, मिठानगर, कोंढवा, पुणे, मॅनेजर तुषार प्रमोदकुमार सबलोक, वय- ३१ वर्ष, रा. आर.एच./१ पेरीविंकल सोसा. बाणेर-पाषाण रोड, बाणेर, पुणे.** आणि दोन वेटर यांना अटक करुन त्यांचेविरुध्द मुबंई दारु बंदी अधिनियम क. ६५ (ड) व सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम- २०१८ चे कलम ४-अ, २१-अ अन्वये कोथरुड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

**सदरची कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे, पुणे शहर श्री.प्रदीप देशपांडे, मा.पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पुणे शहर श्री. शिरिष सरदेशपांडे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२ पुंणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पो.नि. अश्विनी जगताप, पेहवा ४४९५ पवार, पोना १५५९ इंगळे व पोशि शंकर संपते यांनी ही कामगिरी केलेली आहे.**